महाराष्ट्र शासन
महसूल व वनविभाग
जिल्हाधिकारी व जिल्हादंडाधिकारी कार्यालय, रायगड अलिबाग
हिराकोट तलावाजवळ, ता.अलिबाग, जि.रायगड ४०२ २०१
दुरध्वनी क्र. ०२१४१/२२२११८ फॅक्स क्र. ०२१४१/२२७४५१, Email: dcraigad@gmail.com

(गृह शाखा) क्र.गृह/एमएजी-१/जनसुनावणी/इतिवृत्त/४०२७८/२०२० दि. /११/२०२०

प्रति,
प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ रायगड,
रायगड भवन, ७ वा मजला, सेक्टर-११, सी.बी.डी.बेलापूर, नवी मुंबई.

विषय:- दि.१३/१०/२०२० रोजीचे पर्यावरण जाहीर जनसुनावणीचे इतिवृत्ता बाबत.

संदर्भ:- आपलेकडील No.MPCB/ROR/TB/201110-FTS-0191, Date: 10.11. 2020 रोजीचे पत्र.

उपरोक्त विषयासंदर्भात आपलेकडील संदर्भिय पत्रान्वये मे.प्रसोल केमिकल्स प्रायवेट लिमिटेड यांच्या मौजे होनाड ता.खालापूर येथील सर्वे नं.८,१३,१५,१६,२५,७५ या जमिनीवर सिंथेटिक ऑर्गेनिक रसायनांच्या विस्तारासंबंधी पर्यावरण विषयक दि.१३/१०/२०२० रोजी प्रत्यक्ष प्रकल्प स्थळी तसेच Virtual Public Hearing व्दारे आयोजीत जनसुनावणीचे इतिवृत्त मान्यतेसाठी या कार्यालयाकडे सादर केलेले आहे.

सदर इतिवृत्तास याव्दारे मान्यता देण्यात येत असून, इतिवृत्ताच्या स्वाक्षरीत केलेल्या प्रति सोबत जोडण्यात येत आहेत.

21/11/20.
(डॉ.पदमश्री बैनाडे)
अपर जिल्हादंडाधिकारी
रायगड-अलिबाग

# मसुदा

**प्रकल्प प्रवर्तक मेसर्स प्रसोल केमिकल प्रायव्हेट लिमिटेड, सर्व्हे नं. ८,१३,१५,१६,२५,७५,गाव – होनाड. तालुका-खालापूर, जिल्हा – रायगड यांच्या सिंथेटिक ऑर्गेनिक रसायन प्रकल्पाच्या विस्तारिकरणासंबंधी पर्यावरणविषयक प्रत्यक्ष जाहिर जनसुनावणीचे इतिवृत्त**

---

**संदर्भ:-**

१) भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालयाच्या अधिसुचना दिनांक १४-०९-२००६ व सुधारित अधिसुचना दिनांक ०१-१२-२००९ अनुसार

२) भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालयाच्या दिनांक १४-०९-२०२० चे निर्देश

३) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांचे क्रं.बी-२००९१७-एफटीएस-००८२, दिनांक १७-०९-२०२० चे निर्देश

४) जिल्हादंडाधिकारी,रायगड-अलिबाग यांचे क्रं. गृह-मार्ग-१/जनसुनावणी/१५५८०/२०२०, दिनांक १०-०९-२०२० चे आदेश

५) जिल्हादंडाधिकारी,रायगड-अलिबाग यांचे क्रं.गृह-मार्ग-१/जनसुनावणी/२०२०, दिनांक ०५-१०-२०२० चे आदेश

प्रकल्प प्रवर्तक मेसर्स प्रसोल केमिकल प्रायव्हेट लिमिटेड, सर्व्हे नं. ८,१३,१५,१६,२५,७५,गाव – होनाड. तालुका-खालापूर, जिल्हा – रायगड यांच्या सिंथेटिक ऑर्गेनिक रसायन प्रकल्पाच्या विस्तारिकरणासंबंधी पर्यावरणविषयक प्रत्यक्ष जाहिर लोकसुनावणी दिनांक, १३ ऑक्टोबर, २०२० रोजी दुपारी १२.०० वाजता सॅम्युअल हॉल, ४ था माळा, जुना मुंबई-पुणे हायवे (एन.एच.४), खोपोली, जिल्हा – रायगड ४१० ७१० येथे आयोजित करण्यात आली होती.

पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी समिती खालील प्रमाणे-

१) जिल्हादंडाधिकारी, राडगड-अलिबाग किंवा त्यांचे प्रतिनिधी - **अध्यक्ष**

२) प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, रायगड - **सदस्य**

३) उप प्रादेशिक अधिकारी -रायगड-१ महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, नवी मुंबई – ४०० ७१० - **समन्वयक**

श्री जे.एस. साळुंखे, प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ, रायगड, सदस्य, समन्वयक, पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी समिती यांनी पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी समितीच्या अध्यक्षांचे, सदस्यांचे व प्रकल्प प्रवर्तकांचे प्रतिनिधी व मोठ्या संख्येने उपस्थित असलेल्या स्थानिक जनतेचे स्वागत केले. समितीच्या अध्यक्षांच्या परवानगीने पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी बाबतची प्रस्तावना विषद केली.

सदस्य, समन्वयक यांनी असे सांगितले की भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, नवी दिल्ली यांच्या दिनांक १४ सप्टेंबर, २००६ व सुधारित दिनांक १ डिसेंबर, २००९ च्या अधिसूचनेनुसार विशिष्ट प्रकल्पांना पर्यावरणविषयक अनुमती घेणे बंधनकारक असून त्यासाठी आगाऊ पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी आयोजीत करणे बंधनकारक करण्यात आलेले आहे.

श्री सांळुखे यांनी असे सांगितले की प्रकल्प प्रवर्तक मेसर्स प्रसोल केमिकल प्रायव्हेट लिमिटेड, सर्व्हे नं. ८,१३,१५,१६,२५,७५,गाव – होनाड. तालुका-खालापूर, जिल्हा – रायगड यांच्या सिंथेटिक ऑर्गेनिक रसायन प्रकल्पाच्या विस्तारिकरणासंबंधी पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी आयोजित करण्यासाठी अर्ज प्राप्त झाला. सदरहू प्रकल्प पर्यावरण अधिसूचना २००६ अन्वये संवर्ग अ ५ (एफ) मध्ये मोडत असल्याने सदरहू प्रकल्पास भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, नवी दिल्ली यांची "पर्यावरण अनुमती" प्राप्त करणे व त्यासाठी आगाऊ पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी घेणे बंधनकारक आहे.

समन्वयक यांनी असे स्पष्टीकरण दिले की पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणीचा मूळ उद्देश प्रकल्प परिसरातील सामान्य जनतेस प्रकल्पाविषयी व प्रकल्पामुळे होणारे परिणाम व त्याबाबत सामान्य जनतेच्या भावना जाणून घेणे, प्रकल्पात बंधनकारक असणा-या प्रदूषण नियंत्रण संयत्रणेची माहिती सामान्य जनतेस देणे व त्यांनी दिलेल्या सूचनेचा विचार करणे आहे.

प्रकल्प प्रवर्तकांनी भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालयास प्राथमिक मान्यता (ToR) प्रदान करण्यासाठी व पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल तयार करण्यासाठी ऑनलाईन अर्ज सादर केला व त्यास अर्जास भारत सरकारने ऑनलाईन मंजूरी दिनांक २७ जुन, २०१९ रोजी प्रदान केली.

पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांच्या दिनांक १४ सप्टेंबर, २०२० च्या कार्यालयीन टिप्पणीनुसार कोविडच्या पार्श्वभूमीवर पर्यावरणविषयक जनसुनावणी आयोजित करण्यासाठी काही निर्देश पारित करण्यात आले. त्यानुसार उपस्थितांनी बैठकीत मुखपट्टी, दोन व्यक्तींमध्ये अंतर पाळण, सॅनिटायझरचा वापर बंधनकारक करण्यात आलेला आहे.

वरिल पर्यावरण अधिसुचनेनुसार तीसदिवस अगोदर स्थानिक वृत्तपत्रात पर्यावरण विषयक जाहीर लोकसूनावणी सूचना देणेबंधनकारक आहे.त्याअनुषंगाने उप प्रादेशिककार्यालय, रायगड-१, म.प्र.नि. मंडळ, नवी मुंबई यांनी स्थानिक दैनिक वृत्तपत्र लोकसत्ता व कृषिवल यात मराठीत दिनांक १३-०९-२०२० व २६-०९-२०२० व राष्ट्रीय वृत्तपत्र इंडियन एक्सप्रेसयात इंग्रजीत दिनांक १३-०९-२०२० व २६-०९-२०२० रोजी जाहिर सुनावणी सूचना दिलेली होती.त्यात सामान्य जनतेस उपरोक्त प्रकल्पाविषयीकाही आक्षेप, हरकती, सूचना असल्यास तेलेखी नोंदविण्याचे आवाहन करण्यात आले होते.

त्याप्रमाणे नियोजित प्रकल्पाविषयीचापर्यावरण मुल्यांकन आघाताची व कार्यकारी सारांशाची प्रतशासनाच्या अधिसूचित कार्यालयांमध्ये म्हणजे

१) भारत सरकारच्यापर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, विभागीय कार्यालय, पश्चिम-मध्य विभाग.
२) नवीन सेक्रेटरिएट बिल्डिंग, तळमजला, ईस्ट विंग, सिव्हिल लाईन, नागपूर — ४४० ००१,मा. जिल्हादंडाधिकारी कार्यालय-रायगड.
३) मा.अप्पर जिल्हादंडाधिकारी कार्यालय — रायगड.
४) मुख्य कार्यकारी अधिकारी - जिल्हा परिषद, रायगड, महाव्यवस्थापक - जिल्हा उद्योग केंद्र, रायगड.
५) तहसील कार्यालय-खालापूर, जिल्हा — रायगड, ग्रामपंचायत कार्यालय-ग्रुप ग्रामपंचायत, होनाड व चिंचवळी, टेबेवाडी, ढेकू, ठाणेन्हावे, अक्तरगाव , तालुका — खालापूर, जिल्हा — रायगड.
६) मुख्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई.
७) प्रादेशिक कार्यालय,महाराष्ट्र प्रदूषणनियंत्रण मंडळ - रायगड,
८) उप प्रादेशिक कार्यालय,रायगड-१, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळनवी मुंबई.
९) पर्यावरण विभाग, मंत्रालय, मुंबई.
१०) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या संकेतस्थळावर सामान्य जनतेसाठी उपलब्ध करण्यात आलेले होते.

प्रादेशिक अधिकारी यांनीउपस्थित असलेल्यासर्वांना त्यांचे काही आक्षेप,हरकती, सूचना असल्यास ती संधि देण्यात आलेली असून ते लेखी वा तोंडी स्वरुपात देऊ शकतात असेसांगितले.

प्रादेशिक अधिकारी श्रीसाळुंखेयांनी पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी सुरु करण्याची विनंती मा.अध्यक्षांना केली.

अध्यक्षांच्या परवानगीने प्रकल्पाचे पर्यावरण सल्लागार यांनी प्रस्तावित प्रकल्पा विषयीचा संपूर्ण पर्यावरण व्यवस्थापन योजनेबाबत सादरीकरण केले.

सादरीकरणानंतर प्रादेशिक अधिकारी, पर्यावरणविषयक जाहिर लोकसुनावणी समिती यांनी उपस्थितांना त्यांचे काही आक्षेप, सूचना असल्यास त्या नोंदविण्याचे आवाहन केले.

**<u>खालील व्यक्तींनी चर्चेत भाग घेतला:-</u>**

**१) <u>श्री नरेंद्र गायकवाड, राहणार- मुक्काम - आत्करगांव, पोस्ट-साजगांव, तालुका - खालापूर, जिल्हा-रायगड --</u>**

श्री नरेंद्र गायकवाडयांनी अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी-रायगड तथा अध्यक्षा, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती यांना विनंती केली की ही जनसुनावणी ताबडतोब रद्द करावी. प्रसोल केमिकल्स प्रायव्हेट लिमिटेड ही कंपनी मौजे होनाड येथे कार्यरत असून आजूबाजूच्या चार ग्रामपंचायतींच्या सर्व क्षेत्रावर व १० कि.मी. परिघावर प्रकल्पाच्या प्रदूषणामुळे जीवनमानावर परिणाम झालेला आहे. ही जनसुनावणी ही प्रकल्प स्थानावर किंवा चार ग्रामपंचायतीच्या हद्दी आयोजित करणे योग्य होते. पण कोरोनाच्या पार्श्वभुमीवर तेथे शक्य नव्हते, तर इतक्या घाईत ती येथे आयोजित करण्याऐवजी व फक्त १०० लोकांनाच परवानगी मिळणार असल्याने ती करोनाचा प्रादुर्भाव कमी झाल्यावर आयोजित करणे योग्य होते. तरी सदरहु जनसुनावणी रद्द करुन ती परत योग्यवेळी आयोजित करण्यात यावी ही विनंती.

त्यांनी सांगितले की या जनसुनावणीनंतर ग्रामस्थांना निवेदन सादर करावयाचे आहे. श्री नरेन्द्र गायकवाड यांनी सांगितले की २०१३ मध्येही ह्या कंपनीची सुनावणी झाली. ती होनाड ग्रामपंचायतीच्या हद्दीत झाली. सर्व आश्वासने दिली गेली. ग्रामविकासा बाबत व इतरही बाबतीत सर्व आश्वासने देण्यात आली. मात्र काहीही झाले नाही. मप्रनि मंडळानेही जल, वायू प्रदूषणाबाबत काहीही पाहिले नाही. परिसरातील नागरिकांना वासामुळे प्रचंड त्रास होतो. प्रकल्पात शासनाचे पारित केलेले सुरक्षितते बाबतचे सर्व नियमांची पायमल्ली करण्यात येते. प्रकल्प बांधला तेथे सुरक्षितता नाही. अतिज्वलनशील पदार्थ ठेवण्यात येतात. कंपनीजवळून स्थानिकांना प्रवास करताना जीवमुठीत घेऊन प्रवास करावा लागतो. सुरक्षितता नियम पाळले जात नाहित. कंपनीत प्रवेश करताना मोकळी जागा हवी, ती नाही. ही बैठक झाल्यावर आपण, प्रदूषण नियंत्रण मंडळाचे सर्व अधिकारी व आम्ही येतो,आपण प्रत्यक्ष पहाणी करावी.

त्यांनी पुढे आक्षेप नोंदविला की २०१३ ची आश्वासने अजूनही पूर्ण केलेली नाहीत. कामगारांना सुरक्षिततेची हमी नाही. सांडपाणी नदीत सोडणार नाही असे आश्वासन दिले. मात्र ते सोडले जाते. पाण्यात मासे मेले. शेतक-यांचे अतोनात नुकसान झाले. शेतकरी तहसील कार्यालयात उपोषणास बसले. त्यावेळी कंपनीने त्यांची चूक मान्य केली. गुरेढोरे पाणी पिऊ शकत नाहीत.

त्यांनी सांगितले की ब-याच ग्रामपंचायतींच्या पाण्याच्या योजना येथील नदीवर आहेत.

एकही नियम न पाळता दादागिरीने कंपनी जीवाशी खेळते. सांडपाणी नदीत सोडतात. मप्रनि मंडळ पाठिशी घालते. पावसाळ्यात सर्व रासायनिक कचरा नदीत सोडला जातो.

स्थानिक लोक ऑनलाईन प्रणालीशी फारसे जागरुक नाहीत. ग्रामीण भागात नेटचा प्रश्न असतो. तरी ऑनलाईन व प्रत्यक्ष जनसुनावणी रद्द करुन कोरोना संपल्यावर कंपनीच्या बाजूस मोकळ्या मैदानात परत आयोजित करण्यात यावी. तसेच आता येथे फक्त १०० व्यक्तींनाच प्रवेश देणार असल्याने स्थानिकांचे प्रश्न उपस्थित करता येणार नाही.

अध्यक्षा, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी येथे स्पष्टीकरण दिले की १०० व्यक्ती एका सत्रामध्ये (session) येऊ शकतात. जर १०० पेक्षा जास्त व्यक्ती असतील, तर पुढचे सत्र (session) घ्यावे लागते. उपस्थित सर्व व्यक्ती संपेपर्यंत बैठक चालू ठेवावी लागते. सर्वांना संधि देण्यात येते. मात्र बैठकीस येणा-याने मुखपट्टी, सामाजिक अंतर पाळणे व सॅनिटायझरचा वापर करणे हे बंधनकारक आहे.

श्री गायकवाड यांनी सांगितले की अशा प्रकारची माहिती ग्रामस्थांना देण्यात आलेली नाही. त्यामुळे ग्रामस्थ, प्रकल्प बाधित शेतकरी व लोक येऊ शकले नाही. त्याचप्रमाणे या कंपनीचा ज्याठिकाणी त्रास होतो, तेथे ही जनसुनावणी घेणे योग्य होते.

अध्यक्षा, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी प्रकल्प अधिका-यांना उपस्थित केलेल्या आक्षेपांवर उत्तर देण्यास सांगितले.

श्री जे.एस.साळुंखे, प्रभारी प्रादेशिक अधिकारी-रायगड, मप्रनि मंडळ, नवी मुंबई तथा सदस्य, समन्वयक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की मप्रनि मंडळ वेळोवेळी नियमांप्रमाणे कारवाई करत असते. तसेच या प्रकल्पाबाबतीतही कार्यवाही करण्यात आलेली आहे. २०११ मध्ये कंपनीची बँक गॅरंटी जप्त करण्यात आलेली आहे. २०१९ मध्येही त्यांची बँक गॅरंटी जप्त करण्यात आली. त्याचप्रमाणे कोणत्याही प्रकल्पास पारित केलेल्या मानकांचे उल्लंघन झाल्यास त्या त्या वेळी त्यांना पूर्वसूचना देण्यात येते व पर्यावरण कायद्यांतर्गत निर्देशांप्रमाणे पुढील कार्यवाही करण्यात येते.

सदस्य, समन्वयक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी प्रकल्प प्रवर्तकांना खालील गोष्टींचा उत्तरे त्वरित देण्याची सूचना केली –

अ) प्रकल्पातील सुरक्षिततेबाबत स्पष्टीकरण,

ब) हवेचा वास गावात येतो का आणि

क) प्रकल्पात मोकळी जागा (ओपन स्पेस) आहे की नाही?

प्रकल्प प्रवर्तकांचे पर्यावरण सल्लागार यांनी उत्तर दिले की २०१२-२०१३ ला पर्यावरणविषयक जनसुनावणी झालेली आहे. त्यावेळी कंपनीने सीएसआर (कॉर्पोरेट सामाजिक जबाबदारी) निधीव्दारे परिसरात सामाजिक कामे करण्याची कुठलीही योजना राबविली नाही हे मान्य करावे लागते. मात्र पुढील ४-५ वर्षात बरीच सकारात्मक कामे करण्यात आली. केलेल्या कामाबद्दल संबंधित ग्रामपंचायत कार्यालयाने दिलेली पत्रेही येथे दाखविता येतील. कंपनीने जास्तीतजास्त काय कामे करता येतील याबाबत सूचना मागविल्या आहेत.

पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की प्रकल्प अधिकारी स्थानिक कॉलेजात जाऊन स्थानिक विद्यार्थ्यांना कंपनीच्या कामकाजाची माहिती देऊन कॉलेज कॅम्पसमध्ये मुलाखती घेऊन स्थानिकांनाच नोक-या देण्यात आलेल्या आहेत.

यावेळी उपस्थितांनी हे खोटे आहे असा आरोप दिला. कुठल्याही कॉलेजात मुलाखती झालेल्या नाहीत. यावेळी प्रकल्प प्रवर्तक यांनी उत्तर दिले की प्रकल्पात ४२५ लोक काम करतात. ते ४२५ स्थानिक कामगार आहेत. भविष्यात मनुष्यबळाची गरज लागल्यास स्थानिक लोकांमधूनच पुर्ण करण्यात येईल. शिवाय प्रकल्पासाठी जे कंत्राटदार लागतात, त्या खाजगी कामांसाठी ७५% स्थानिक कंत्राटदार आहेत.

सदस्य, समन्वयक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी प्रकल्प प्रवर्तकांना जे आक्षेप नोंदविण्यात आले, त्याबाबत उपस्थितांना माहिती देण्यास सांगितले.

प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की कंपनीतील उत्पादनामुळे वासावर आता आक्षेप नोंदविण्यात आलेला आहे. आपण आधुनिक उपकरणे प्रकल्पात वापरतो. आता प्रकल्पात वॉटर प्रुफ डबल स्टेज कव्हर सिस्टिम ही आधुनिक सयंत्रणा कार्यान्वित करण्यात आलेली आहे. तसेच गॅस फ्लेअर सिस्टिम आहे त्यामुळे कंपनीबाहेर वास येणार नाही.

यावेळी श्री नरेन्द्र गायकवाड व इतर यांनी येथे आक्षेप नोंदविला की प्रकल्पातून धुर व धुळ बाहेर येते. आताही बाहेर येत आहे. यावेळी प्रकल्प अधिका-यांनी

सांगितले H2S गॅस हा धुरातून येत नाही, तो पूर्णपणे स्क्रब केला जातो. की प्रकल्पात स्क्रबर सिस्टिम नाही. त्याचप्रमाणे बॉयलरला फिल्टर बॅग फिल्टर, डस्ट कलेक्टर कार्यान्वित करण्यात आलेला आहे.

२) **श्री शशिकांत सुदाम देशमुख, माजी सरपंच, होनाड ग्रामपंचायत, तालुका – खालापूर, जिल्हा – रायगडः-**

श्री शशिकांत सुदाम देशमुख यांनी आक्षेप नोंदविताना सांगितले की मी स्वतः या कंपनीस ना हरकत प्रमाणपत्र (No Objection Certificate) दिलेले आहे. त्यावेळी त्यांनी आश्वासन दिले होते की बॉयलर दुरुस्त करु. मात्र एक साधा बॉयलर दुरुस्त केला नाही. लोकांना त्याचा एवढा त्रास होतो की त्याच्या धुराच्या त्रासामुळे लोकांना डोळ्याचे ऑपरेशन करावे लागले. चुकीचे काम केल्यास लोक बोलणार. तो बॉयलर रस्ताजवळ लावलेला आहे. म्हणजे रस्त्यावरिल माणसांना काही झाल्यास कंपनी त्याची जबाबदारी घेईल का?

प्रकल्पाच्या अधिका-यांनी सांगितले की बॉयलर पॉवर जनरेशन प्लॅटसाठी असून त्या बॉयलरला अत्याधुनिक पध्दतीची ट्रीपल सिस्टिम म्हणजे बॅग फिल्टर, डस्ट कलेक्टर व ईएसपी – इलेक्ट्रो स्टॅटिक प्रेसिपरेटर कार्यान्वित करणार असल्याने त्यातुन धुळ बाहेर उडली जात नाही. बॉयलर रस्त्यापासून किमान ५००-६०० मीटर दूर आहे.

पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की जुने बॉयलरला बॅग फिल्टर नव्हते. जुने बॉयलर वापरण्यात येणार नाही. त्यांनी सांगितले की इलेक्ट्रो स्टॅटिक प्रेसिपरेटर (ईएसपी) ही अत्याधुनिक सयंत्रणा असून ते ९९.५% कार्यक्षमता दाखविते.

यावेळी एक ग्रामस्थ यांनी प्रश्न उपस्थित केला की प्रकल्पातून आवाज भरपूर येतो. म्हणजे आम्ही कंपनीचे प्रदूषण सहन करायचे, पण आमच्या गावातील एकही मुलगा कामाला घेतला नाही, तर बाहेरचे लोक घेतले आहेत असा आक्षेप नोंदविला. त्यावेळी प्रकल्प अधिकारी यांनी सांगितले की कंपनी आताही आपणास व अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांना अहवाल देऊ शकते की ८०% कर्मचारी व कामगार हे स्थानिक परिसरातील, तालुक्यातीलच आहेत. श्री नरेंद्र गायकवाड व इतर यांनी येथे आक्षेप नोंदविला की प्रकल्पापासून फक्त ६०-७० मीटरवर शाळा आहे. याचा त्रास शाळेतील मुलांना होत असतो. त्यावेळी प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की शासनाच्या नियमाप्रमाणेच प्रकल्पाची उभारणी करण्यात आलेली आहे.

३) **श्री प्रकाश पाटील, सदस्य ग्रुप ग्रामपंचायत चिंचवली, तालुका-खालापूर, जिल्हा-रायगडः-**

गेले २५ वर्षे प्रसोल कंपनी कार्यरत आहे. प्रकल्प येणे व तो कार्यरत राहणे हे विकासासाठी गरजेचे आहे. येथे काही स्थानिकांनी प्रकल्पाविषयी काही आक्षेप नोंदविले. प्रकल्प विस्तारिकरण करत असताना, प्रगती करत असताना सरकारी नियमांचे पालन करुन, लोकांच्या आरोग्याची काळजी घेऊन, सीएसआर निधीतून परिसरात सामाजिक कार्य करुन जर प्रकल्प विस्तारीकरण करत असेल, तर मतभेद विसरुन त्यास पाठिंबा देण्याची आवश्यकता आहे. काही अडचणी येतात. आता प्रकल्प अधिकारी यांनी सांगितले आहे की प्रकल्पामुळे बेरोजगारांना रोजगार मिळेल. ग्रामपंचायतीला उत्पन्न मिळेल. आमचा अनुभव आहे की जास्तीतजास्त सहकार्य आपण प्रकल्पास करणे गरजेचे आहे. प्रकल्प प्रवर्तकांनीही पर्यावरणाचे नियम पाळणे आवश्यक आहे.

श्री नरेंद्र गायकवाड यांनी मत मांडले की आताच श्री सदाशिव पाटील यांनी सूचना मांडली. श्री गायकवाड म्हणाले की २०१३ साली ज्यावेळी ह्या कंपनीची सुनावणी झाली, त्यावेळी मी व्यक्तीशः पाठिंबा दिलेला होता. त्यावेळी जी जी आश्वासने दिलेली होती, त्याची पायमल्ली करण्यात आली. त्यांवेळी कंपनीने सांगितले होते की आम्ही शाळेसाठी निधी देऊ, पाणीपुरवठा योजनेस मदतच करु, त्यांनी काहीही केलेले नाही. आता प्रश्न आहे विस्तारिकरण झाल्यावर प्रकल्प प्रवर्तक सर्व नियमांचे पालन करतील काय?

प्रकल्प अधिकारी यांनी सांगितले की आता जे सादरीकरण करण्यात आले त्यात आपण शाळेच्या वर्गांची दुरुस्ती व सुशोभीकरण, शाळेच्या पाण्याच्या टाकीची दुरुस्ती व स्वच्छता प्रसोल कंपनीने पूर्णपणे केलेली आहे. यावेळी श्री नरेंद्र गायकवाड यांनी मत मांडले की शाळा अगोदरपासून होती. त्यावेळी प्रकल्प अधिकारी यांनी मत मांडले की प्रकल्पाचे कार्यकारी संचालक येथे उपस्थित आहेत. त्यांच्या आदेशानेच खर्च करण्यात आला.

४) **श्री संदीप देशमुख, राहणार-आडोशी गाव, सदस्य होनाड ग्रामपंचायत -**

मी प्रकल्प विस्तारिकरणाचे स्वागत करतो. आज जे जे प्रकल्प येतील, त्यांचे आपण स्वागत केले पाहिजे. आज झाड लावले आहे. उद्या त्याची फळे मिळतील. स्थानिकांना रोजगार मिळणे हे महत्वाचे आहे. तो मिळेल व स्थानिक व्यवसायाची भरभराहट होण्यास निश्चितच मदत होईल. या प्रकल्पाचा स्थानिकांना व स्थानिक व्यवसायांना फायदा व्हा.

श्री देशमुख म्हणाले की श्री नरेंद्र गायकवाड यांनी सूचना केल्याप्रमाणे स्थानिकांच्या आरोग्य प्रश्न सोडवावेत. भविष्यात ही कंपनी स्थानिकांचे आरोग्य सांभाळणारी कंपनी म्हणून सर्वांना ओळखावी. त्याचप्रमाणे प्रकल्प अधिका-यांना प्रदूषण न होण्याची काळजी घ्यावी.

यावेळी प्रकल्प अधिकारी यांनी उत्तर दिले की आम्ही याबाबत निश्चितच पाठपुरावा करु. त्याचप्रमाणे पर्यावरण व्यवस्थापन योजनेत काही त्रुटी असल्यास त्या निश्चितच दूर करण्यात येतील. प्रकल्पात स्थानिकांनाच प्राधान्य देण्यात येते. त्याप्रमाणे ते देऊ, मग कायमस्वरुपी किंवा कंत्राटी असला तर त्यात स्थानिकांनाच प्राधान्य देण्यात येते.

**५) श्री विजु हंगे, राहणार-खोपोली, जिल्हा-रायगड-**

मी खोपोली शहरात राहतो. मी पूर्ण प्रकल्प अहवाल वाचला. प्रकल्प खरोखर सुंदर आहे. मात्र यात स्थानिकांच्या काही तक्रारी असल्या, तर त्या सहकार्याने सोडवणे आवश्यक आहे. स्थानिकांना प्रकल्पात प्राधान्य देण्यात यावे. कंपनी जगली तर आजूबाजूचा परिसर व स्थानिकांचा फायदाच आहे. तरी प्रकल्पास पाठिंबा.

**६) श्री मनिष खवले, ग्रामस्थ – ढेकू, तालुका-खालापूर, जिल्हा-रायगड –**

त्यांनी दोन प्रश्न पर्यावरण सल्लागार यांना विचारले. श्री खवले यांनी सांगितले की मागच्या जनसुनावणी २०१३ साली आदित्य एन्व्हॉरमेंट यांना अहवाल तयार केलेला होता. आपण अहवालात लिहिलेले आहे की प्रकल्प स्थानावर ८५० झाडे आहेत. आता ७ वर्षे झाली. आपण आताच मे महिन्यात सर्वेषण केले असेल. तर ती झाडे आहेत का? त्यांना विनंती केली की पूर्ण माहिती व सत्य असेल तीच देण्यात यावी. तुम्ही स्वतः केलेले असेल, तर तुम्ही ती देणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे आपण जे क्षेत्र दाखविलेले आहे त्यात हरित पट्टा जागा दोन एकर उपलब्ध आहे का, तेवढी जागा कंपनीकडे आहे का? याचे स्पष्टीकरण द्यावे. कारण हरित पट्ट्यासाठी पावणेसहा एकर जागा आपल्याकडे असली पाहिजे.

ते म्हणाले की प्रकल्पांचे स्वागतच आहे. पण कंपनीने नियम पाळले की नाही त्याची दखल सरकारी यंत्रणेने घेणे आवश्यक आहे. तसेच प्रकल्पात झाडे लावली की नाही हे पाहण्यासाठी व त्याबाबत कार्यवाही करण्यासाठी कुठली यंत्रणा आहे?

त्यावेळी सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिति यांनी येथे सांगितले की प्रकल्पात खुली जागा (ओपन स्पेस) किती आहे याचेही स्पष्टीकरण त्वरित देण्यात यावे. उरलेला भाग हा ग्रीन बेल्ट असणे अपेक्षित आहे.

पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की प्रकल्प ८,२९० चौरसमीटर आहे. आमचा संघ अभ्यास करताना कारखान्यातीलही अभ्यास करतो. आम्ही तो परत सर्वेषण करुन त्याप्रमाणे तो सुधारण्यात येईल. प्रकल्प पर्यावरण सल्लागारांच्या प्रतिनिधीने सांगितले की आम्ही अंदाजे संख्या लिहितो. मात्र, अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सूचना केल्याप्रमाणे याचा पुनर-सर्वेषण घेण्यात येईल.

यावेळी श्री मनिष खवले यांनी आक्षेप नोंदविला की मागील अहवाल व आताचा अहवाल यात क्षेत्रफळाबाबत स्पष्टीकरण देण्यात यावे. त्याचप्रमाणे २४ तास प्राणवायु देणारे वड, पिंपळ व उंबर ही झाडे लावावित.

७) **श्री रामचंद्र देशमुख, राहणार – खालापूर, जिल्हा-रायगड -**

कारखाना जगला पाहिजे. तो वाढला पाहिजेच. मागच्या जनसुनावणी बैठकीत मी होतो. त्यावेळी आम्ही सर्वांनी जी सहकार्याने मान्यता होती, ती दिली. ती लोक प्रयत्न करतात, त्यांना करु द्यावे. मात्र येथे उपस्थित करण्यात आलेल्या काही सूचना, आक्षेप, शंका उपस्थित केल्या, त्यांना न्याय द्यावा. ते म्हणाले की मी आता श्री मनिष खवले यांच्या मताशी सहमत आहे की झाडे लावताना जी २४ तास प्राणवायु देतात वड, पिंपळ व उंबर ती लावावीत. प्रकल्प प्रवर्तकानेही नियम पाळावेत. प्रकल्पास शुभेच्छा.

पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की आम्ही परत जागेचे निरिक्षण करु, पुनर-सर्वेषण करु व अहवाल तयार करु.

श्री नरेन्द्र गायकवाड यांनी सांगितले की वस्तूस्थिती जनतेसमोर येणे आवश्यक आहे. अहवाल चुकीचा कसा तयार होतो? म्हणजे ही सामान्य जनतेची फसवणुक आहे.

८) **श्री नितेश पाटील, राहणार – अक्तर गाव, तालुका – खालापूर, जिल्हा – रायगड-**

त्यांनी सांगितले की माझी मिसेस अक्तरगावची ग्रामपंचायत सरपंच आहे. कंपनीने जे प्रकल्पासाठी सर्व्हे नंबर ८, १३, १५, १६, २५, ७५, दिलेले आहेत. ते कुठचे आहेत, कंपनीच्या मागील आहेत का शेजारचे आहेत. सर्वांची तक्रार आहे की कंपनी नियम पाळत नाही. रस्त्यापासून अंतर सोडण्याचे नियम आहेत. तेही कंपनीने केलेले नाही. हा विस्तारित प्रकल्प कुठे होणार? २२,०००.० स्केअर मिटर्स जागा सोडलेली आहे, तर ती दाखवावी, पार्किंग सुविधा दाखवावी. आमच्या माहितीप्रमाणे कंपनीने नियम

प्रकल्प अधिकारी यांनी एकत्रित उत्तर देताना सांगितले की श्री मनिष खवले यांनी झाडे लावण्याबाबतच्या दिलेल्या सूचनांची त्वरित अंमलबजावणी करण्यात येईल. श्री नरेश पाटील यांना उत्तर देण्यात आले की प्रकल्प प्रवर्तक नेहमीच स्थानिकांचाच विचार करतात, त्यांच्या सहकार्याशिवाय प्रकल्प कसा यशस्वी होईल, स्थानिकांना रोजगार देण्याचे पुरेपुर पालन करण्यात येईल.

---

## दुसरे सत्र

कोविडच्या पार्श्वभूमीमुळे भारत सरकार, पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, नवी दिल्ली यांच्या निर्देशांनुसार जनसुनावणी घेण्यात आली.

**खालील व्यक्तींनी चर्चेत भाग घेतला:-**

१) **श्री संदीप रविंद्र बोरले, उपसरपंच, ठाणेन्हावे, जिल्हा-रायगड**

नदीच्या पात्रात दुषित पाणी सोडले गेले. त्यामुळे मासे मेले होते. शेतकरी उपोषणाला बसले. उपोषण झाल्यावर कंपनीने मोबदला दिला. कंपनी चांगले काम करत आहे. सांडपाणी प्रकल्पाबाहेर जाणार नाही. प्रकल्प विस्तारिकरणात स्थानिकांना प्राधान्य देण्यात यावे. आमच्या ग्रामपंचायतीचे उत्पन्न् अत्यंत अल्प आहे. सीएसआर निधीतंर्गत आमच्या गावाला एक एम्बुलन्स मिळावी हा मी विनंती करतो. प्रकल्प विस्तारिकरणास पाठिंबा.

प्रकल्प अधिकारी यांनी सांगितले की नोकरीच्या विषयाबाबत एवढेच सांगण्यात येते की कौशल्य फार महत्वाचे आहे. जर गावातील मुलांमध्ये कौशल्य असेल तर प्रकल्पात नोकरी लागेल. त्याचप्रमाणे आपण एम्ब्युलन्सचा प्रस्तार द्यावा. बैठकीत मंजूरी मिळाल्यावर आपणास निरोप देण्यात येईल. अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी मत मांडले की बैठकीत स्थानिकांनी केलेल्या मागणीनुसार प्रकल्पात १००% रोजगाराची संधि देण्यात यावी. जी गुणवत्ता पाहिजे, ती स्थानिकांनी प्रशिक्षण देऊन रोजगाराची संधि देण्यात येऊ शकते. त्यांनी कंपनीस असे प्रशिक्षण देण्याची सूचन् केली. कंपनीने सागितले की २०१६ मध्ये ५० जण घेतले. ते सर्वेजण प्रकल्प सेवेत घेण्यात आले.

२) **श्री उच्चरप्पा वरचाले, फाटा, तालुका-खालापूर, जिल्हा-रायगड-**

कोरोनामुळे कंपन्या बंद पडत आहेत. येथे कंपनी विस्तारिकरण करत आहे. संपूर्ण पाठिंबा.

डावलून बांधकाम केलेले आहे. नियमाप्रमाणे बांधकाम करताना अंतर सोडलेले नाही. यांच्या सर्व गाड्या ह्या रस्त्यावर उभ्या असतात. आमचे गाव कंपनीच्या पुढे आहे. येता जाता आम्हांला ट्रॅफिकचा खूपच त्रास होतो. एखादया महिलेस दवाखान्यात नेत असाल तर तेथे भयानक ट्रॅफिक असतो. ग्रामस्थांना विश्वासात घ्यावे. तरी शासकीय अधिका-यांनी प्रत्यक्ष पहाणी करुन पुढील कार्यवाही करावी. प्रकल्प ग्रामस्थांना विश्वासात घेऊन जर विस्तारिकरण केले असते, तर आम्ही पाठिंबा दिला असता.

प्रकल्प अधिकारी यांनी सांगितले की उत्पादनात वाढ होणार आहे. त्यासाठी नविन उपकरणे आणणार आहोत. उत्पादनात वाढ करण्यासाठी काही उपकरणात बदल करणार आहोत. नविन जागा बांधण्याचा विचार नाही. स.न. हे होनाड ग्रामपंचायतीने दिलेले आहेत. स.नं.७५ हा पार्किंग व्यवस्थेसाठी आहे. यावेळी उपस्थितांनी आक्षेप नोंदविला की गाड्या रस्त्यावर उभ्या असतात. प्रकल्प अधिकारी यांनी सांगितले की गाडया आमच्या पार्कीगमध्ये उभ्या करण्यास सांगण्यात येतील.

सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी प्रकल्प अधिका-यांना सूचना केली की स्पष्ट शब्दात उत्तर द्यावे. जर २२,००० स्वेअर फीट जागा आहे, तर ३,०० स्वेअर फीट पार्कीगला जागा आहे की नाही हे स्पष्ट सांगावे. प्रकल्प अधिकारी म्हणाले की आमच्याकडे जागा आहे, त्यास ती दाखवा ही मागणी झाली. अध्यक्षा, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी स्थानिक गावक-यांना विश्वासात घेऊनच विस्तारिकरण करावे अशी सूचना दिली.

९) श्री नरेश पाटील, रायगड जिल्हापरिषद सदस्यः-

त्यांनी मत मांडले की एखादा कारखाना विस्तारिकरण करत असेल, तर स्थानिक जनतेची अपेक्षा रोजगाराची असते. तरी प्रकल्पात स्थानिकांना प्राधान्य द्यावे.

प्रकल्प अधिका-यांनी सांगितले की स्थानिकांनाच रोजगारात प्राधान्य देण्यात येते. त्याचप्रमाणे स्थानिक कंत्राटदार हे चांगले काम करतात.

प्रकल्प अधिका-यांनी सांगितले की श्री नरेन्द्र गायकवाडांच्या सूचनांचे आम्ही निश्चितच पालन करु.

१०) श्री उल्हास देशमुख, स्थानिक रहिवाशी यांनी सांगितले की मुलाचा अर्ज दिला होता, पण त्याचा विचारही केला नाही.

अध्यक्षा, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी प्रकल्प अधिका-यांना स्थानिकांनी उपस्थित केलेल्या प्रश्नांचे उत्तर देण्याची सूचना केली.

३) **<u>श्री राहूल पाटील, राहणार-चिंचवळी, तालुका-खालापूर, जिल्हा-रायगड-</u>**
कंपनी प्रदूषण कमी करण्यासाठी प्रयत्न करत आहे. प्रकल्पात भरपूर झाडे लावली आहेत. काही कमी पडत असतील तर ती लावावीत. कंपनीमुळे गावाचा फायदाच आहे. विस्तारिकरणास पाठिंबा.

४) **<u>श्री महादेव ठोंबर, होनाड, जिल्हा-रायगड-</u>**
कारखान्याचे स्वागत. सादरीकरणात सर्व सांगितले आहे. स्थानिकांना रोजगार देतात. प्रकल्प अधिका-यांनी सांगितले की कौशल्यविकास कार्यक्रम अंमलात आणू. स्थानिकांना १०० टक्के रोजगार देणार.

५) **<u>श्री विलास देशमुख, होनाड, जिल्हा-रायगड-</u>**

कंपनी सामाजिक बांधिलकीसाठी बरीच मदत करते. पर्यावरण योजनांसाठी खर्च करते. पूर्वी धूळ उडत होती. आता उडत नाही. प्रकल्पात ८० टक्के स्थानिक आहेत. होनाड ग्रामपंचायतीने पाठिंबा दर्शविलेला आहे.

६) **<u>श्री अभिजीत देशमुख, गाव – होनाड, जिल्हा-रायगड</u>**
किती कंत्राटदार स्थानिक आहेत?
कंपनी अधिका-यांनी उत्तर दिले की ८० पैकी ५६ स्थानीक आहेत.

७) **<u>श्री दिगंबर पाटील, राहणार-चिंचवली, तालुका-खालापूर,जिल्हा-रायगड -</u>**
२००६-२००९ कामगार होतो. टँकर व्यवसाय सुरु केला. टँकर व्यवसाय चांगला. विस्तारिकरणास पाठिंबा

८) **<u>श्री देवेन्द्र पाटील, राहणार-चिंचवली, तालुका-खालापूर,जिल्हा-रायगड -</u>**
कंपनी वाढली तरच परिसराचा विकास होईल. कंपनीने कौशल्यविकासावर भर द्यावा.

सदस्य,पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी बैठकीत सांगितले की उपस्थित करण्यात आलेले आक्षेप, सूचना याची नोंद घेण्यात येऊन ती अंतिम पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालासोबत पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकरा, नवी दिल्ली येथील तज्ज्ञ समितीस सादर करण्यात येईल.

सदस्य,पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी बैठकीत सांगितले की उपस्थितांनी प्रकल्प प्रवर्तक प्रकल्प स्थानावर सुरक्षितता नियम पाळत नसल्याचे आरोप केलेले आहेत व कामगारांचे आयुष्य धोक्यात येण्याची शक्यता व्यक्त केली आहे. त्यामुळे प्रकल्प प्रवर्तकांना सूचना करण्यात येते की त्यांनी औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालय, महाराष्ट्र शासन (Directorate of Industrial Safety& Health, Maharashtra State) (DISH) यांचा संपूर्ण प्रकल्पाबाबतचा पाहणी व अभिप्राय अहवाल (Detailed Inspection & Remark in respect of Accidence & Safety Report) वेळोवेळी करुन घेणे हे

कंपनीला बंधनकारक राहिल, त्यासअनुसरुन Directorate of Industrial Safety& Health, Maharashtra State- (DISH) व कंपनीने पुढील खबरदारी घेऊन या प्रकल्पाचा विचार करावा. सदरची जबाबदारी ही कंपनी व Directorate of Industrial Safety& Health, Maharashtra State- (DISH) यांची राहिल.

याबाबत प्रकल्प प्रवर्तकांनी व कंपनीने Directorate of Industrial Safety& Health, Maharashtra State -(DISH) यांच्या सहकार्याने पुढील कार्यवाही त्वरित करावी.

नंतर पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समितीने उपस्थितांना कोणाचे आक्षेप, सूचना असल्यास त्या उपस्थित करण्याचे आवाहन केले.

उपस्थितांकडून कुठलाही प्रतिसाद नव्हता. माननीय अध्यक्षांनी सदस्य, समन्वयक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांना बैठकीचा समारोप करण्याची सूचना केली.

सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की बैठकीत उपस्थित करण्यात आलेल्या सूचना, आक्षेप यांची नोंद घेण्यात आलेली असून त्यांचा इतिवृतात समावेश करण्या येईल. सदरहू इतिवृत्त अंतिम पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालासोबत पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांच्याकडे सादर करण्यात येईल. तेथील तज्ज्ञ समिती याबाबत योग्य तो निर्णय घेईल. त्यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानले व मा. अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांच्या वतीने जनसुनावणी बैठक संपल्याचे जाहिर केले. मानून बैठक संस्थगित करण्यात आली.

**(जे. एस. साळुंखे)**
सदस्य,
पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती
तथा
प्रादेशिक अधिकारी-रायगड,
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,
नवी मुंबई

**(डॉ. पद्मश्री श्रीराम बैनाडे)**
अध्यक्षा,
पर्यावरणविषयक जाहिर लोकसुनावणी समिती
अप्पर तथा
अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी, रायगड,
जिल्हा-रायगड

# मसुदा

**प्रकल्प प्रवर्तक मेसर्स प्रसोल केमिकल्स प्रायव्हेट लिमिटेड (पूर्वी प्रसोल केमिकल्स लिमिटेड), सर्व्हे नं. ८, १३, १५, १६, २५, ७५, गाव – होनाड, तालुका – खालापूर, जिल्हा – रायगड, महाराष्ट्र यांच्या सिंथेटिक ऑरगॅनिक रसायन प्रकल्पाच्या विस्तारासंबंधी ऑनलाईन पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणीचे इतिवृत्त**

**संदर्भः-** १) भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालयाच्या अधिसुचना दिनांक १४-०९-२००६ व सुधारित अधिसुचना दिनांक ०१-१२-२००९ अनुसार

२) भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालयाच्या दिनांक १४-०९-२०२० चे निर्देश

३) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांचे क्रं.बी-२००९१७-एफटीएस-००८२, दिनांक १७-०९-२०२० चे निर्देश

४) जिल्हादंडाधिकारी,रायगड-अलिबाग यांचे क्रं. गृह-मार्ग-१/जनसुनावणी/१५५८०/२०२०, दिनांक १०-०९-२०२० चे आदेश

५) जिल्हादंडाधिकारी,रायगड-अलिबाग यांचे क्रं.गृह-मार्ग-१/जनसुनावणी/२०२०, दिनांक ०५-१०-२०२० चे आदेश

उपरोक्त संदर्भ (२) व (३) नुसार, कोविड विषाणुचा प्रादुर्भाव टाळण्यासाठी प्रत्यक्ष जनसुनावणीबरोबरच ऑनलाईन जनसुनावणी घेण्याचे आदेश देण्यात आलेले होते.

उपरोक्त संदर्भ (४)नुसार संबंधित **प्रकल्प प्रवर्तक मेसर्स प्रसोल केमिकल्स प्रायव्हेट लिमिटेड (पूर्वी प्रसोल केमिकल्स लिमिटेड), सर्व्हे नं. ८, १३, १५, १६, २५, ७५, गाव – होनाड, तालुका – खालापूर, जिल्हा – रायगड, महाराष्ट्र** यांच्या **सिंथेटिक ऑरगॅनिक रसायन प्रकल्पाच्या विस्तारासंबंधी ऑनलाईन पर्यावरणविषयक जाहिर सुनावणी दिनांक १३-१०-२०२० रोजी** घेण्यात आली. त्यासाठी CISCO WEBEX APP वापरण्यात आले.

अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी,रायगड तथा अध्यक्षा, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी ऑनलाईन बैठकीत सर्व शासकीय अधिकारी, प्रकल्प अधिकारी यांचे स्वागत करुन ऑनलाईन येणा-यांना पॉवर पॉईंट सादरीकरण दाखवून प्रश्नांचे उत्तर देण्यास सांगितले.

पर्यावरण सल्लागार यांनी ऑनलाईन संपर्कातील सर्वांसाठी सादरीकरण दाखविले. त्यांनी सांगितले की प्रसोल ही भारतातील अग्रगण्य व वेगाने वाटचाल करणारा कंपनी असून ती भारत सरकारने निर्यातीकरिता दोन स्टार मानांकित कंपनी आहे. प्रसोल ही आयएसओ

९००१:२०१५, आयएसओ १४००१:२०१५ आणि ओएचएसएएस १८००१:२०१७ प्रमाणित कंपनी आहे. त्यांनी प्रकल्पाच्या पर्यावरण व्यवस्थापन योजनांची माहिती ऑनलाईन संपर्कातील सर्वांसाठी सादरीकरणने दाखविली. त्यावेळी पंधरा लोक ऑनलाईन संपर्कात होते.

त्यानंतर ऑनलाईन संपर्कातील व्यक्तींना प्रकल्पाच्या पर्यावरण व्यवस्थापन योजनांबाबत काही सूचना, आक्षेप असल्यास त्या नोंदविण्याचे आवाहन करण्यात आले.

**ऑनलाईन बैठकीचे इतिवृत्त-**

**खालील व्यक्तींनी ऑनलाईन जनसुनावणी बैठकीत सहभाग घेतला –**

१) **मिस रिना पाटील, राहणार-ताकई गांव, तालुका – खालापूर, जिल्हा – रायगड:-**

मिस रिना पाटील यांनी प्रकल्प प्रवर्तकांचे प्रकल्पाचे विस्तारिकरण करण्याबद्दल त्यांचे अभिनंदन केले. त्यांनी मत मांडले की परिसरात ब-याच महिला पदवीधर, इंजिनियर असून विस्ताकिरकरणात त्यांना रोजगाराची संधि मिळेल काय?

प्रकल्प प्रवर्तक यांनी उत्तर दिले की प्रकल्पात स्थानिकांना निश्चितच प्राधान्य देण्यात येणार आहे. जर आपणाकडे विशिष्ट पदासाठी आवश्यक असणारी शैक्षणिक अर्हता असेल, तर आपणास निश्चितच प्रकल्पात काम करण्याची संधि मिळू शकते.

मिस रिना पाटील यांनी धन्यवाद व्यक्त केले.

२) **श्री मोहन पाटील, राहणार-चिंचवळी गाव,तालुका-खालापूर,जिल्हा – रायगड:-**

कंपनी गावात मदत करते. शैक्षणिक कंपनीस आमची पाठिंबा आहे. कुठल्याही बाबतीत मदत करण्यास गाव तयार आहे.

श्री मोहन पाटील यांनी प्रकल्प विस्तारिकरण करणार असल्याने व्यवस्थापनाचे आभार मानले. त्यांनी सांगितले की प्रकल्प हा गावातील विविध सामाजिक प्रगतीसाठी हातभार लावत आहे. त्याचप्रमाणे शैक्षणिक बाबतीतही मदत करत आहे. प्रकल्पात स्थानिकांना रोजगार देण्यात येतो. त्यामुळे ह्या कंपनीच्या विस्तारिकरणास माझा पाठिंबा राहिल. आपणास गावाकडून काही पाठिंब्याची गरज असल्यास मला संपर्क करण्यात यावा.

प्रकल्प प्रवर्तक यांनी श्री मोहन पाटील यांना धन्यवाद दिले. त्यांनी सांगितले की आपणास निश्चितच सहकार्य करण्यात येईल.

ऑनलाईन जनसुनावणीत सर्वांना सूचना वा आक्षेप नोंदविण्याचे आवाहन करण्यात आले. उपस्थितांकडून कोणताही प्रतिक्रिया नव्हती.

अध्यक्षा, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांच्याशी चर्चा करण्यात येत होती. सर्वांनाच काही सूचना, आक्षेप नोंदविण्याचे आवाहन करण्यात आले. ऑनलाईन संपर्कातील सर्वांनीच आपला संपर्क थांबविला.

अध्यक्षा, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती या पूर्णपणे संपर्कात होत्या. त्यांनी प्रश्न उत्तरे पूर्ण झाली असतील व कोणीही संपर्कात (ऑनलाईन) नसल्यास बैठक संपविण्याची सूचना केली.

श्री लोहिया, क्षेत्र अधिकारी,महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, रायगड यांनी संपर्कात राहिलेल्या (ऑनलाईन असलेल्या) सर्वांचे आभार मानून सांगितले की बैठकीत उपस्थित करण्यात आलेल्या सूचनांची नोंद घेण्यात आलेली असून त्याचा बैठकीच्या इतिवृतात समावेश करण्यात येईल. त्यांनी अध्यक्षा, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समितीतर्फे संपर्कात आलेल्या सर्वांचे आभार मानून मा. अध्यक्षांच्या वतीने बैठक संपल्याचे जाहिर केले.

**(जे. एस. साळुंखे)**
सदस्य,
पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती
तथा
प्रादेशिक अधिकारी-रायगड,
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,
नवी मुंबई

**(डॉ. पद्मश्री श्रीराम बैनाडे)**
अध्यक्षा,
पर्यावरणविषयक जाहिर लोकसुनावणी समिती
तथा
~~अतिरिक्त~~ अप्पर जिल्हादंडाधिकारी, रायगड,
जिल्हा-रायगड




# रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आ.)

राष्ट्रीय अध्यक्ष तथा मा. ना. केंद्रीय सामा. न्याय राज्यमंत्री रामदासजी आठवले साहेब

**श्री. नरेंद्र चंद्रकांत गायकवाड** (युवक अध्यक्ष - रायगड जिल्हा)

मु. आत्करगांव, पो. साजगांव, ता. खालापूर, जि. रायगड ४१० २०३. मोबा. 9421992719 / 9326151193


संदर्भ क्र. :-

दिनांक :- १३/१०/२०२०

प्रति,
**मा. जिल्हाधिकारी साहेब रायगड**
अलिबाग-रायगड.
यांसी,

**अर्जदार** :- **आयु. नरेंद्र चंद्रकांत गायकवाड**
**जिल्हा युवक अध्यक्ष - रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले)**

**विषय** :- **मे. प्रोसोल केमिकल्स प्रा. लि. या कंपनीचे 'सिन्थेटीक ऑर्गनिक रसायन' या उत्पादना संदर्भात घेण्यांत येणा-या जनसुनावणीमध्ये सदर कंपनीला नव्याने कोणतीही परवानगी देण्यांत येवू नये बाबत....**

मा. महोदय,

वरिल विषयान्वये आपणांस नम्रतापूर्वक निवेदन करतो की, मे. प्रासोल केमिकल्स प्रा.लि. ही कंपनी गेली अनेक वर्षांपासून ग्रुप ग्रामपंचायत होनाड या गावाचे हद्दीत आपला कारखाना चालवित असून सदर कंपनी ही हजार्डस्ट या अति ज्वलनशिल पदार्थांचे उत्पादन करीत आहे. गेल्या अनेक वर्षात या कंपनीमुळे या भागातील पर्यावरणाचे नुकसान होवून प्रदूषण जास्त प्रमाणांत वाढलेले आहे आणि कंपनीच्या या प्रदुषणामुळे या भागातील जीवनमानावर याचा विपरित परिणाम झालेला दिसून येत आहे. या कंपनीच्या केमिकलच्या वेस्टेज मुळे कंपनी शेजारून वाहणारी नदी सतत प्रदूषित होत असते. ही नदी पुढे जावून पाताळगंगा नदीला मिळते. ही नदी सतत प्रदूषित होत असलेकारणाने या नदीतील मासे अनेक वेळा मेलेल्या अवस्थेत पाहण्यांत आलेले आहेत. ही नदी प्रदूषित होत असलेकारणाने या नदीवर पुढे जावून उपजिविका करणारे शेतकरी यांची उपासमार होवू लागलेली आहे. या प्रदूषित नदीमुळे गुरे जनावरे यांना शुध्द पाणी पिण्यांस मिळत नाह व हे पाणी पिण्यामुळे गुरे, जनावरे देखिल या अगोदर दगावलेली आहेत. या नदीवर व पुढे पाताळगंगा नदीवर काही गावांचा पाणीपुरवठा योजना अवलंबून आहेत.

पुढे पहा....२....



# रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आ.)

राष्ट्रीय अध्यक्ष तथा मा. ना. केंद्रीय सामा. न्याय राज्यमंत्री रामदासजी आठवले साहेब

**श्री. नरेंद्र चंद्रकांत गायकवाड** (युवक अध्यक्ष - रायगड जिल्हा)

मु. आत्करगांव, पो. साजगांव, ता. खालापूर, जि. रायगड ४१० २०३. मोबा. 9421992719 / 9326151193

संदर्भ क्र. :-

दिनांक :- १३/१०/२०२०



या प्रदूषित पाण्यामुळे होणा-या त्रासाला कंटाळून शेजारी गावातील शेतकरी हे सन २०१८ मध्ये तहसिल कार्यालय खालापूर या ठिकाणी उपोषणांस देखिल बसले होते. परंतु तद्नंतर या शेतक-यांना कंपनीने त्यांची नुकसान भरपाई देवून व पुन्हा नदीपात्रामध्ये केमिकल युक्त प्रदूषित पाणी सोडणार नाही असे खोटे आश्वासन देवून उपोषण सोडण्यांस भाग पाडून आज पुन्हा कंपनी नैसर्गिक असलेल्या या नदीमध्ये प्रदूषित केमिकलचे खराब पाणी सोडत आहे.

या कंपनीमुळे हवेतून होणा-या प्रदूषणाने नागरिकांच्या आरोग्यावर परिणाम होत असून नेहमीच्या या प्रदूषणाला आम्हा नागरिकांना सामोर जावे लागत आहे. या कंपनीमध्ये २००७ साली अपघात होवून दोन कामगार मृत्युमुखी पडलेले आहेत व आता काही दिवसांपूर्वी देखिल एक कामगार अशाच अपघातात मरण पावलेला आहे. वेळोवेळी येथे कामगाराबाबत छोटे-मोठे अपघात होतच असतात. परंतु नोकरी गमवावी लागेल या भितीने व व्यवस्थापनाच्या दंडुकशाहीने येथील कामगार कंपनी व्यवस्थापनाला घाबरून तक्रार न करता नोकरी करीत असतात.

आदरणीय जिल्हाधिकारी रायगड यांस या पत्राद्वारे सुचित करू इच्छितो की, सदरील कंपनी ही नगर रचना विभाग, अलिबाग (टाऊन प्लानिंग) यांच्या सर्व नियमांना केराची टोपली दाखवून बिनधास्तपणे सर्व नियमांचे उल्लंघन करून आपला कारखाना चालवित आहेत.

साहेब, या कंपनीच्या गेटसमोरून ताकई-आडोशी हा बांधकाम विभागाच्या (P.W.D.) अखत्यारीतील रस्ता जातो. नियमानुसार रस्त्याच्या मध्यभागापासून ४५ ते ४८ मीटर पर्यंत कंपनीने बिल्डींग अथवा कंपनी प्लांटची उभारणी करू नये, हा शासन निर्णय कंपनीची जागा एन. ए. करतांना अटी शर्ती मध्ये नमुद असून देखिल येथे या नियमांची पायमल्ली होताना दिसते.

पुढे पहा....३....



# रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आ.)


राष्ट्रीय अध्यक्ष तथा मा. ना. केंद्रीय सामा. न्याय राज्यमंत्री रामदासजी आठवले साहेब

**श्री. नरेंद्र चंद्रकांत गायकवाड** (युवक अध्यक्ष - रायगड जिल्हा)

मु. आत्करगांव, पो. साजगांव, ता. खालापूर, जि. रायगड ४१० २०३. मोबा. 9421992719 / 9326151193


संदर्भ क्र. :-

दिनांक :- १३/१०/२०२०



सदर कंपनीने आपली कंपनी बिल्डींग व शेड प्लांट हा नियमानुसार न उभारता रस्त्याच्या मध्यभागापासून मोजणी केली असता, २३/२५ मीटरच्या आत भरेल. म्हणजेच काय तर नियम सर्व तोडलेले आहेत.

नगर रचना विभाग, अलिबाग (टाऊन प्लानिंग) च्या नियमानुसार कंपनीने औद्योगिकरणासाठी घेतलेल्या जागेत ३३ टक्के जागा ही 'मोकळी जागा' ठेवायची असते व सदर कंपनीत वृक्षारोपण देखिल करायचे असते. परंतु या कंपनीने अशी कोणतीही ३३ टक्के जागा कंपनीमध्ये मोकळी ठेवलेली नाही, हा देखिल शासनाच्या नियमांचा भंग आहे.

सदरील कंपनीने कंपनीची जागा ही एन.ए. केलेली आहे का ? ती दाखवावी. एन.ए. केलेली असेल तर आणखी एका नियमाप्रमाणे कंपनी येथे वागताना दिसत नाही. कंपनीच्या परिसरात प्रवेश करतांना गेट नंबर १ व गेट नं. २ या दोन्ही गेटमधून कंपनी आवारात जाणा-या रस्त्या व्यतिरिक्त मोकळी जागा शिल्लक नाही. जाणा-या रस्त्या व्यतिरिक्त मोकळी जागा शिल्लक नाही. कंपनीने नगर रचना विभाग, अलिबाग (टाऊन प्लानिंग) चे सर्व नियम धाब्यावर बसवून मनमर्जीप्रमाणे आपल्या कंपनीचे प्लांट उभारलेले आहेत. कामगारांच्या सुरक्षेची कोणतीही हमी या कंपनीने अद्यापपर्यंत घेतलेली दिसत नाही. कंपनीचे सर्व प्लांट हे कंपनीच्या वॉल कंपाउंड लगत असून प्लांटच्या मागून कंपाउंड पासून कोणताही रस्ता सुरक्षेच्या कारणास्तव कंपनीने ठेवलेला नाही.

मेहेरबान साहेब, जर या ठिकाणी नेहमीप्रमाणे समोरील बाजूने आग लागली तर कामगारांना मागील बाजूस जावून जीव वाचविण्यासाठी अथवा ॲम्ब्युलन्स साठी किंवा फायर ब्रिगेडच्या गाडीला येण्या-जाण्यासाठी रस्ता उपलब्ध नसल्याकारणाने कामगारांना येथे स्वतःचा जीव वाचविणे देखिल शक्य होणार नाही व पर्यायाने मोठी जिवीतहानी होण्याची दाट शक्यता आहे. असे एक ना अनेक जिल्हाधिकारी साहेब यांच्या आदेशाची अवहेलना येथे होतांना दिसते.

पुढे पहा....४....



# रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आ.)


राष्ट्रीय अध्यक्ष तथा मा. ना. केंद्रीय सामा. न्याय राज्यमंत्री रामदासजी आठवले साहेब

**श्री. नरेंद्र चंद्रकांत गायकवाड** (युवक अध्यक्ष - रायगड जिल्हा)

मु. आत्करगांव, पो. साजगांव, ता. खालापूर, जि. रायगड ४१० २०३. मोबा. 9421992719 / 9326151193


संदर्भ क्र. :-

दिनांक :- १३/१०/२०२०



साहेब सदरील कंपनी ही 'हजार्डस्ट' अति ज्वलनशिल केमिकलची निर्मिती या ठिकाणी करीत असून सुरक्षेची या कंपनीकडून कोणतीच उपाय योजना करून ठेवलेली नाही.

या कंपनीच्या चुकीच्या धोरणास्तव व सुरक्षेच्या उपायाबाबत असलेला निष्काळजीपणा हा भविष्यात भोपाळ सारख्या वायु दुर्घटनेसारख्या घटनेला खतपाणी घालण्यासारखी बाब आहे.

साहेब सदर कंपनीने २०१३ मध्ये फिनॉल आणि ॲसीटॉन या दोन केमिकल्सचे उत्पादन घेता यावं म्हणून अशाच प्रकारे जनसुनावणी जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत घेतली होती. त्यावेळी कंपनीने सुरक्षेच्या उपाय योजनेबाबत जे काही वचन त्या ठिकाणी दिले होते. त्याचा नंतर कंपनी व्यवस्थापनाला विसर पडला आणि हवेतील प्रदूषण जल प्रदूषण याचा प्रमाण वाढला पर्यायाने नागरिकांना या सर्व त्रासाला  सामोरे जाण्याची वेळ आली. कंपनीने त्या जनसुनावणीच्या वेळेस आजुबाजूच्या परिसराचा विकास करण्याच्या बाबत जी घोषणा केली होती. ती देखिल कागदावरच राहीली. कंपनीने या परिसरातील नागरिकांच्या जीवनमान उंचावण्याबाबत वचन दिले होते. परंतु कंपनीने आपल्या कोणत्याच वचनाची पुर्तता आजपर्यंत केलेली नाही. परिसरातील गावांचा विकास शैक्षणिक विद्यार्थ्यांचा विकास  आरोग्याच्या दृष्टीने विकास करण्याच्या हेतुने ही कंपनी त्यावेळेस वचनबध्द झाली होती. परंतु आजपर्यंत नागरिकांना दिलेला शब्द कंपनी व्यवस्थापन पाळू शकलेली नाही.

साहेब  सदरील २०१३ रोजी घेण्यांत आलेली जनसुनावणी ही कंपनीपासून अंदाजे ६० ते ७० मीटरवर असलेल्या पाताळगंगा विद्यालय या शाळेमध्ये घेण्यांत आलेली होती. आजही ती शाळा त्याच ठिकाणी तशाच अवस्थेत असतांना कंपनीने विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक विकासाबाबत दिलेला शब्द न पाळता त्या शाळेला देखिल मदत केलेली नाही.

साहेब, नगर रचना विभाग, अलिबाग (टाऊन प्लॅनिंग) यांच्या नियमानुसार एन.ए. करीत असतांना कंपनीच्या सदरील जागेच्या जवळपास ५०० मीटर पर्यंत शाळा, मंदिर, लोकवस्ती नसावी. हा नियम असतांना देखिल हजार्डस्ट हे अति ज्वलनशिल केमिकल उत्पादन करणारी कंपनी हिला परवानगी देण्यांत कशी आली हा देखिल संशोधनाचा विषय आहे. या बाबतीत नगर

पुढे पहा....५....




# रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आ.)

राष्ट्रीय अध्यक्ष तथा मा. ना. केंद्रीय सामा. न्याय राज्यमंत्री रामदासजी आठवले साहेब

**श्री. नरेंद्र चंद्रकांत गायकवाड** (युवक अध्यक्ष - रायगड जिल्हा)

मु. आत्करगांव, पो. साजगांव, ता. खालापूर, जि. रायगड ४१० २०३. मोबा. 9421992719 / 9326151193


संदर्भ क्र. :-

दिनांक :- १३/१०/२०२०



रचना विभाग, अलिबाग (टाऊन प्लानिंग) चे त्यावेळचे अधिकारी चुकले नाहीत का ? विद्यार्थी ज्या शाळेत शिकतात त्या शाळेच्या जवळ हजार्डस्ट हे अति ज्वलनशिल केमिकल उत्पादन करणा-या कंपनीला दिलेली परवानगी ही विद्यार्थ्यांच्या जिवीतास धोका निर्माण करणारी असून सदर कंपनीवर याबाबतीत कठोर कारवाई करण्यांत यावी.

साहेब सदर कंपनीने आजपावेतो शासन निर्णयाला हरताळ फासून एन.ए. ऑर्डरच्या सर्व अटी शर्तींचा भंग केलेला असून या नागरिकांच्या जिवताशी खेळणा-या कंपनी व्यवस्थापनावर पंचकोषीतील ग्रामस्थांचा विश्वास नाही.

अटी शर्तीचे उल्लंघन करणारी मे. प्रासोल केमिकल्स प्रा.लि. होनाड या कंपनीला भविष्यातील कोणत्याही नविन विस्तारीकरणासाठी अथवा नविन उत्पादन करण्यासाठी परवानगी देण्यांत येवू नये व सतत नगर रचना विभाग, अलिबाग यांच्या अटी शर्तीचा भंग केला असल्याकारणाने या अगोदर कंपनीला दिलेल्या सर्व परवानग्या रद्द करून कंपनीवर कठोरात कठोर कारवाई करावी, ही विनंती. कारवाई न केलेल्यास मोठ्या जनआंदोलनाला जिल्हा प्रशासनाला सामोरं जावं लागेल, याची आपण नोंद घ्यावी.

आजच्या मे. प्रासोल केमिकल्स प्रा. लि., होनाड या कंपनीच्या करण्यांत येणा-या विस्तारीकरणाबाबत तसेच नविन घेण्यांत येणा-या उत्पादनाबाबत घेण्यात येत असलेल्या या जनसुनावणीस फक्त १०० लोकांच्या उपस्थित ही जनसुनावणी घेण्यांत येत आहे, याच कारणास्तव या जनसुनावणीस संपूर्ण ग्रामस्थांचा ठाम विरोध आहे. कारण की, या कंपनीमुळे ०४ ग्रामपंचायती प्रदूषणाने बाधीत होत आहेत, आणि या ०४ ग्रामपंचायतींतील नागरिकांची लोकसंख्या ही १४ ते १५ हजारापर्यंतची आहे, याची मा. जिल्हाधिकारी कार्यालयाने नोंद घ्यावी.

पुढे पहा....६....



# रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आ.)


राष्ट्रीय अध्यक्ष तथा मा. ना. केंद्रीय सामा. न्याय राज्यमंत्री रामदासजी आठवले साहेब

**श्री. नरेंद्र चंद्रकांत गायकवाड** (युवक अध्यक्ष - रायगड जिल्हा)

मु. आत्करगांव, पो. साजगांव, ता. खालापूर, जि. रायगड ४१० २०३. मोबा. 9421992719 / 9326151193


संदर्भ क्र. :-

दिनांक :- १३/१०/२०२०



सदरील कंपनीला या उत्पादनासाठी जिल्हाधिकारी कार्यालयाने मंजुरी दिली तर आम्ही **रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले) पक्षाच्या** वतीने जिल्हाधिकारी कार्यालयासमोर सनदशिर मार्गाने आंदोलन करू, आणि **त्याच्या होणा-या सर्व परिणामांस कंपनी व्यवस्थापन आणि आपले प्रशासनच जबाबदार राहील,** याची नोंद घ्यावी.

आमच्या विभागातील जनतेच्या सुरक्षेचा दृष्टीकोनातून मा. जिल्हाधिकारी कार्यालयाने सदरील कंपनीची परवानगी नाकारावी, ही विनंती.

आपला विश्वासु,

**आद. नरेंद्र चंद्रकांत गायकवाड**
**युवा जिल्हाध्यक्ष-रायगड**
**रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले)**

**प्रत रवाना :-**

१) मा. पंतप्रधान कार्यालय, भारत सरकार, नवी दिल्ली.
२) मा. केंद्रीय पर्यावरण मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली.
३) मा. ना. रामदासजी आठवले साहेब, केंद्रीय सामा. न्याय राज्यमंत्री, भारत सरकार, नवी दिल्ली.
४) मा. केंद्रीय वने व पर्यावरण समिती, भारत सरकार, नवी दिल्ली.
५) मा. मुख्यमंत्री सो., महाराष्ट्र राज्य. मंत्रालय मुंबई-३२
६) मा. वने व पर्यावरण मंत्री सो., महाराष्ट्र राज्य. मंत्रालय मुंबई-३२
७) मा. वने व पर्यावरण राज्यमंत्री तथा पालकमंत्री सो., महाराष्ट्र राज्य. मंत्रालय मुंबई-३२
८) मा. M.S. एम.पी.सी.बी., सायन कार्यालय, मुंबई. महाराष्ट्र
९) मा. R.O./ SRO. एम.पी.सी.बी., बेलापूर कार्यालय, मुंबई. महाराष्ट्र
१०) मा. खासदार सो., मावळ लोकसभा मतदार संघ
११) मा. स्थानिक आमदार सो., कर्जत विधानसभा मतदार संघ
१२) मा. तहसिलदार सो., खालापूर, जि. रायगड.
१३) मा. उपविभागीय पोलीस अधिकारी सो., खालापूर, जि. रायगड.
१४) मा. पोलीस निरीक्षक सो., खोपोली पोलीस स्टेशन, खालापूर, जि. रायगड.
१५) मा. प्रासोल केमिकल्स प्रा. लि., होनाड, ता. खालापूर, जि. रायगड.
१६) मा. सर्व पत्रकार / संपादक / मा. इलेक्ट्रॉनिक मिडीया.

स्थापना :२३.०६.१९९३ ॥ ग्रामविकासातुन देशविकास ॥

# ग्रुप ग्रामपंचायत आत्करगांव

कार्यालय : मु- आत्करगांव,पो-साजगांव,ता-खालापुर,जि-रायगड

जा.क्र. /२०२०

दिनांक : १२/१०/२०२०

प्रति,

मा.अप्पर जिल्हादंडाधिकारी सो,
हिराकोट तलाव पोलीस लाईन,
ता-अलिबाग,जि-रायगड -४०२ २०१.

प्रति,

महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ ,
उप-प्रादेशिक कार्यालय,रायगड-१,
रायगड- भवन, ६ वा मजला,
सेक्टर- ११,सी.बी.डी.बेलापूर, नवी मुंबई - ४०० ६१४.

यांसी सविनय सादर,

विषय :- मे प्रसोल केमिकल्स प्रा.लि.सर्व्हे नं-८,१३,१५,१६,२५,७५ गाव होनाड, ता- खालापूर, जि-रायगड यांच्या सिंथेटिक ऑर्गेनिक रसायंनाच्या प्रस्तावित विस्ताराला असलेल्या विरोधाबाबत.

महोदय ,

उपरोक्त संदर्भीय विषयान्वये आपणास पत्राव्दारे कळवित आहोत कि प्रसोल कंपनीची सिंथेटिक ऑर्गेनिक रसायनांच्या प्रस्तावित विस्तारासाठी ठेवलेली जनसुनावणीचे पत्र आम्हाला प्राप्त झाले ते पत्र आमच्या ग्रामपंचायत हददीत प्रसिध्दी फलकावर प्रसारीत केले तसेच गावात चावडीवर दवंडीव्दारे वाचन केले सदर पत्राचे प्रसिध्दी व दवंडी केल्यानंतर ग्रामपंचायत हददीतील ग्रामस्थांनी ग्रामपंचायतमध्ये येवुन या प्रस्तावित सिंथेटिक ऑर्गेनिक रसायंनाच्या विस्ताराला स्पष्ट नकार दर्शविला आहे.तसेच आमच्या ग्रामपंचायत कमिटीने देखील या प्रकल्पाला विरोध दर्शविला आहे.तसेच मा.सरपंच यांनी व ग्रामपंचायत कमिटीनी असे ठरवले कि सदरची घेण्यात येत असलेली जनसुनावणी हि १०० लोकांमध्ये न घेता ती कोरोना संसर्ग कमी झाल्यानंतर सर्व ग्रामस्थांच्या समोर पुढील काही महिन्यात हि जनसुनावणी घेण्यात यावी. व पुढील घेण्यात येणारी जनसुनावणी हि आमच्या साजगांव ते आडोशी या पंचकोशी विभागात घेण्यात यावी तरी सदर अर्जाचा आपण योग्य तो विचार करून निर्णय घ्यावा अन्यथा आम्हाला यासाठी जनआंदोलन पुकारावे लागेल याची आपण दखल घ्यावी व सदर होणारी जनसुनावणी रदद करुन पुढील काही महिन्यात आयोजीत करावी हि विनंती .

सोबत :- मासिकसभा ठरावाची प्रत.

ग्रामसेवक
ग्रुप ग्रामपंचायत आत्करगांव
ता. खालापूर, जि. रायगड

सरपंच
ग्रुप ग्रामपंचायत आत्करगांव
ता. खालापूर, जि. रायगड